वाचले :१) श्री. पंडीत केरु निंबाळकर व इतर रा. लोहगांव, ता. हवेली, जि. पुणे यांचा दि. १५/५/२०१४ रोजीचा अर्ज.

२) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४

३) मा.आयुक्त, पुणे विभाग पुणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक मह-२२ जमिन/जनरल/आर आर/७७२/०३ दिनांक २२/९/२००३.

४) सहाय्यक संचालक, नगर रचना/ पुणे -३० यांचेकडील पत्र क्र. रेखांकन/ एनएबीपी/ मौ. लोहगांव/ ता. हवेली/ ग. नं. २८५/३ / ससंपु/ ३९१०, दि. २७/६/२०१४

५) प्रभारी अपर जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, पुणे नागरी समुह, पुणे यांचेकडील दिनांक ३ मे, २०११ रोजीचे पत्र

६)वन संरक्षक, पुणे वनविभाग, पुणे यांचेकडील पत्र क्र. कक्ष-६/जमीन/११५/२००९-१० दि.१४/५/०९

७) नगरविकास विभागाकडील परिपत्रक क्र. नाजक -२२११/प्र क्र./१३८ /नाजकधा -२, मुंबई-३२, दि. ७ जुन २०११

८) मुख्य अग्निशामन अधिकारी पुणे महानगरपालिका यांचे कडील पत्र क्र. FB/७०२ दिनांक २६/५/२०१४

९) भारत सरकार, पर्यावरण व वन विभाग, यांचे कडील क्र. F.No. १-४/२०१२- RE (Pt), दि. १३/११/२०१३

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे
महसूलशाखा डिजी/ /१४
क्र.पमह/एनए/एसआर/४०१/२०१४
पुणे १ दि. ११/३ /२०१५

जिल्हाधिकारी पुणे

विषयः- मौजे- लोहगांव, ता.हवेली,जि. पुणे येथील जमीन स..नं. २८५/३ पै. क्षेत्र १००००.०० चौ.मी. क्षेत्रास निवासी प्रयोजनार्थ महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४ नुसार अकृषिक परवानगी देणे बाबत ...

आदेश

मौजे- लोहगांव, ता.हवेली,जि. पुणे येथील जमीन स..नं. २८५/३ पै. क्षेत्र १००००.०० चौ.मी. क्षेत्रास निवासी प्रयोजनार्थ महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४ नुसार अकृषिक परवानगी मंजुरी मिळणेबाबत श्री. पंडीत केरु निंबाळकर रा. लोहगांव, ता. हवेली, जि. पुणे यांचा दि. १५/५/२०१४ रोजी या कार्यालयाकडे विनंती अर्ज केलेला आहे.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने सहायक संचालक नगर रचना पुणे यांनी त्यांचे कडील पत्र क्र. रेखांकन /एनएबीपी/ मौ. लोहगांव/ ता. हवेली/ ग. नं. २८५/३ / ससंपु/ ३९१०, दि. २७/६/२०१४ अन्वये मंजुरीची शिफारस केली आहे.

मौजे लोहगांव, ता. हवेली जि. पुणे विषयांकित मिळकतींचे सादर अभिलेखांवरून खालीलप्रमाणे क्षेत्र हक्कनोंदणीस दाखल असल्याचे दिसुन येत आहे.

अ.क्र.	जमीन मालकाचे नाव	स.नं	७/१२ प्रमाणे एकूण क्षेत्र (चौ.मी)	बिनशेती करावयाचे क्षेत्र (चौ.मी.)
१.	पंडीत केरु निंबाळकर	२८५/३	१००००.००	१००००.००
	एकूण क्षेत्र		१००००.००	१००००.००
अर्जदार यांनी रेखांकन नकाशात समाविष्ठ केलेल क्षेत्र				१००००.००
(-) रस्त्याखालील बाधित क्षेत्र				०.००
बिनशेती करावयाचे निव्वळ क्षेत्र				१००००.००
रेखांकनाचे प्रयोजन				निवासी

अर्जदार यांनी अर्जासोबत सादर केलेले सर्व हक्कनोंद उतारे, वन विभागाकडील राखीव वनाची यादी, तहसिलदार हवेली, यांचा स्थळपाहणी अहवाल व कार्यालयातील ॲलिनेशन रजिस्टर मधील नोंदी यावरुन दिसून येते की,

१. विषयांकित जमीनीचे वरील जमीनमालक यांनी सदरचे क्षेत्र हे वारसाने धारण केलेले असुन त्याबाबत फेरफार क्र.९३६४ अन्वये गावी नोंद झालेली आहे. मुळ मालक यांनीच अकृषिक परवानगी मिळणे बाबत अर्ज केला आहे.
२. तहसिलदार हवेली यांचा अहवाल व कार्यालयातील ॲलिनेशन रजिस्टर मधील नोंदी पहाता सदर जमीन वतन/इनाम जमीन नाही.
३. वन सरंक्षक पुणे ,वनविभाग पुणे यांनी या कार्यालयास पाठविलेल्या वन जमिनीची यादी व सीडी यावरुन सदर जमीन वनसंवर्गापैकी नाही.
४. तहसिलदार हवेली यांचेकडील पत्र क्र. बिनशेती/एसआर/३४२/२०१४ दिनांक ४/७/२०१४ रोजीच्या स्थळपहाणी अहवालानुसार प्रस्तावित क्षेत्रातून उच्च दाबाची विद्युत वाहिनी जात नाही. तसेच सदर जागेवर अनधिकृतपणे बांधकाम केलेले नाही.
५. विषयांकित गावास नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम १९७६ च्या तरतुदी लागू आहेत.

नागरी जमिन (कमाल धारणा व विनिमय) अधिनियम, १९७६ निरसित करण्यात येऊन शासनाने नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) निरसन अधिनियम, १९९९ दिनांक २९/११/२००९ पासुन स्विकृत केलेला आहे. शासनाचे नगरविकास विभागाकडील पत्र क्र.नाजक-१०(२००८)/प्र.क्र.१/२००८/नाजकधा-१, दिनांक ०१ मार्च, २००८ अन्वये कलम १०(३)/१०(५)/२० व २१ अंतर्गत करण्यात आलेली कार्यवाही वगळता अन्य कलमांतर्गत झालेल्या कार्यवाहीबाबत ना.ज.क.धा.अधिनियमांतर्गत परवानगी आवश्यकता नाही. तथापि, जमीन धारकाकडुन/विकासकाकडुन विक्री अथवा विकसन परवानगी मागीतलेल्या मिळकती संदर्भात निरसन अधिनियमाच्या संरक्षित कलमांतर्गत त्यांच्या मिळकती संदर्भात कार्यवाही झालेली नाही, या आशयाचे शपथपत्र व बंधपत्र

रु.३००/- स्टॅम्पपेपरवर घेण्यात येऊन जमिनीचे हस्तांतरण व विकसनास परवानगी देण्यात यावी अशी सुचना दिलेल्या आहेत.

त्यानुसार अर्जदार यांनी विहित नमुन्यातील शपथपत्र व बंधपत्र रु.३००/- चे स्टॅम्पपेपरवर दिनांक १०/७/२०१४ रोजी सादर केलेले आहे. सादर केलेल्या शपथपत्र व बंधपत्रानुसार विषयांकित मिळकतीबाबत विवरणपत्र दाखल केले नसल्याचे नमूद करून त्यामध्ये प्रश्नाधिन स.क्र. २८५/३ मौजे-लोहगांव, ता. हवेली येथील १००००.०० चौ.मी. क्षेत्र हे अतिरिक्त नसल्याचे प्रतिज्ञापत्र केले आहे.

प्रस्तुत मिळकतीबाबत युएलसी कायदयातंर्गत अर्जदार यांनी विवरणपत्र दाखल केले होते काय? तसेच कलम १०(३), १०(५) अन्वये कार्यवाही केलेल्या यादीमध्ये तसेच कलम २० अन्वये सुट दिलेल्या, कलम २१ खालील योजनांचे यादीत सदर जमिनीचा समावेश आहे काय? तसेच प्रकरणामध्ये कलम ८ (४) अन्वये निर्णय होऊन अतिरिक्त क्षेत्र निरंक घोषित केले असलेस सदरचे प्रकरण आपल्या कार्यालयामध्ये उपलब्ध आहे काय? याबाबतची माहिती २० दिवसामध्ये अभिप्राय सादर करणेबाबत युएलसी कार्यालयास पत्र क्र. पमह /एनए/एसआर/४०१/१४ दिनांक १५/५/२०१४ अन्वये कळविणेत आलेले होते. सद्यस्थितीमध्ये सदरचे पत्र युएलसी कार्यालयास पाठवून २० दिवसांपेक्षा अधिक कालावधी होऊनही युएलसी कार्यालयाकडील अभिप्राय प्राप्त झालेला नाही.

तथापि या कार्यालयाकडे पुणे नागरी समुह कार्यालयाने त्यांचेकडील पत्र क्र.युएलसी/सीए-२/१६१९/२००७, दि.०१/११/२००७ अन्वये पुणे नागरी समुहातील समविष्ठ गावातील ज्या सर्व्हे/गट क्रमांकाच्या क्षेत्रासाठी युएलसी कायदा कलम ६ अन्वये विवरणपत्र दाखल होऊन कलम १०(३), १०(५) अन्वये कार्यवाहीबाबतची यादी व सीडी या कार्यालयास पाठविलेली आहे. त्या यादी व सीडीनुसार प्रश्नाधिन सर्व्हे क्र. बाबत क्षेत्र अतिरिक्त घोषित केलेले असल्याचे नमूद नाही. याबाबत शासनाचे नगर विकास विभागाचे पत्र क्र.नाजक-२२११/प्र.क्र.१३८/नाजकधा-२, दिनांक ०७/०६/२०११ नुसार ज्या प्रकरणी युएलसी कायदा कलम १०(३), १०(५) नुसार कार्यवाही झालेली नाही अथवा ती प्रलंबित आहे त्या प्रकरणी युएलसी/नागरी समूहाकडून अभिप्राय अथवा ना हरकत घेण्याची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच प्रश्नाधिन मिळकतीबाबत आदेश पारीत झाल्यावर देखिल पडताळणीसाठी आदेशाची प्रत पुणे नागरी समुह यांचे कार्यालयाकडे पाठविणेत येणार आहे.

तसेच दिनांक ०३ मे, २०११ रोजीचे युएलसीकडुन प्राप्त झालेली यादी व शासनाच्या नगर विकास विभागाकडील दिनांक ७ जुन, २०११ रोजीचे पत्रानुसार, सीआयडीकडील पत्रे, ३० संदिग्ध प्रकरणांची यादी व बनावट/बोगस आदेशांची यादी पाहता विषयांकित जमीनीचा त्यामध्ये समावेश नाही.

सहाय्यक संचालक नगररचना, पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्र. रेखांकन/एनएबीपी /मौ. लोहगांव/ ता.हवेली/ ग.नं.२८५/३ /संसपु/३९१०, दिनांक २७/६/२०१४ अन्वये मंजुरीची शिफारस केली आहे.

प्रादेशिक योजना प्रस्ताव व अनुज्ञेयता -

विषयांकीत प्रकरणी मुळ मालकाचे क्षेत्र २७१००.०० चौ.मी. असून त्यापैकी अर्जदार यांच्या मालकीचे क्षेत्र १००००.०० चौ.मी. असल्यामुळे तेवढयाच क्षेत्रावर नियोजीत बिनशेती समुह गृहबांधणी योजनेकरीता रेखांकन / बांधकाम प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुसार सदर प्रस्तावाखालील जागा ही मंजूर पुणे प्रादेशीक योजनेतील सेक्टर एच मध्ये अंतर्भुत असून त्यातील तरतुदीनुसार रहिवास विभागात समाविष्ट होत आहे. तसेच सदर जागेस दक्षीण बाजुस अस्तित्वातील २४.०० मी. रुंद पोहोच रस्ता उपलब्ध आहे. सदर रस्त्याची आखणी रेखांकन / बांधकाम नकाशावर योग्य पणे दर्शविलेली आहे.

त्यामुळे प्रस्तुत जागेच्या १००००.०० चौ.मी. अबाधीत क्षेत्रावर नियोजीत रहिवास / वाणिज्य वापर अनुज्ञेय होत आहे. नियोजीत रेखांकन / बांधकाम नकाशाच्या हद्दी प्रकरणा सोबतच्या मुळ वहिवाटीनुसारचे मोजणी नकाशानुसार सर्वसाधारणपणे जुळतात.

जागा पहाणीचा तपशिल:- जागा पाहणी केली असता जागा खुली व समपातळीत असून जागेस पुर्व बाजुस १२ मी. रुंद पोहोच रस्ता उपलब्ध आहे.

भारत सरकार पर्यावरण व वन विभाग, पर्यावरण भवन, सीजीओ कॉम्पलेक्स, लोधी रोड, नवी दिल्ली यांचेकडील क्र. F.No. १-४/२०१२- RE(Pt), दि १३/११/२०१३ रोजीचे Direction under Section ५ of Environment (Protection) Act, १९८६ चे नोटीफीकेशननुसार सदरचे गाव हे Ecologically Sensetive Area (ESA) चे यादीत समाविष्ट नाही.

मा.आयुक्त, पुणे विभाग,पुणे यांचेकडील परिपत्रक क्र.मह-२/जमीन /जनरल /आरआर /७७२/ २००३, दिनांक २२/०९/२००३ मधील तरतुदीनुसार अर्जदार यांनी दिनांक १०/७/२०१४ रोजीचे विहीत नमुन्यातील नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र व क्षतिपत्र दाखल केले आहे. सदर प्रतिज्ञापत्रामध्ये विषयांकित जमिनीबाबत खालील नमुद केलेल्या कोणत्याही कायदयाच्या तरतुदीचा भंग झालेला नाही असे विशद केले आहे.

१) मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८
२) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६
३) महाराष्ट्र शेत जमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९७६
४) इनाम जमीनी खालसा करण्यासाठीचे निर्गमित केलेले विविध कायदे
५) मुंबई तुकडे पाडण्यास प्रतिबंध करणे व जमीन एकत्रिकरण करणे अधिनियम १९४७
६) महाराष्ट्र खाजगी वने संपादन अधिनियम १९७५
७) महाराष्ट्र अनुसूचित जमातीच्या जमिनी प्रत्यार्पित करणे अधिनियम १९७४
८) नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम १९७६
९) महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तिंचे पुनर्वसन अधिनियम १९८६.

उपरोक्त नमुद कायदयातील तरतुदीचा भंग होत नसलेचे तसेच विषयांकित जमीन भोगवटादार वर्ग-२ पैकी नसलेचे प्रतिज्ञापत्रात नमुद केलेले आहे.

अर्जदार यांनी १००००.०० चौ.मी. क्षेत्रासाठी निवासी प्रयोजनार्थ मंजुरी मिळणेकामी ०.१०/-पैसे प्रति चौ.मी. याप्रमाणे आगावू बिनशेतसारा र.रु. १०००.०० रुपांतरीत कराची र.रु. ५०००.०० जिल्हा परिषद उपकर र.रु. ७०००.००, ग्रामपंचायत कराची र.रु. १०००.०० अशी एकुण रक्कम रु. १४०००.०० दिनांक २०/२/२०१५ रोजी व मोजणी फी रक्कम रु. २०००/- दि.२०/२/२०१५ रोजी शासनजमा करुन चलन सादर केले आहे.

वरील परिस्थिती विचारात घेता,अर्जदार यांना अकृषिक परवानगी देणेस हरकत नाही. म्हणून महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये जिल्हाधिकारी, पुणे यांना प्रदान करणेत आलेल्या शक्तीनुसार मी, सौरभ राव, जिल्हाधिकारी पुणे, अर्जदार श्री. पंडीत केरु निंबाळकर रा. लोहगांव, ता. हवेली, जि. पुणे यांनी मौजे- लोहगांव, ता.हवेली,जि. पुणे येथील जमीन स..नं. २८५/३ पै. क्षेत्र १००००.०० चौ.मी. क्षेत्रास निवासी प्रयोजनार्थ, सहा. संचालक नगररचना, पुणे यांच्याकडील पत्र क्र. रेखांकन/ एनएबीपी/मौ. लोहगांव/ ता.हवेली/ ग.नं.२८५/३ /संसपु/३९१०, दिनांक २७/६/२०१४ च्या शिफारसीस अधिन राहुन घेवुन खालील अटी व शर्तीवर अकृषिक परवानगी देत आहे.

रेखांकन / बांधकाम नकाशे मंजुर करावयाच्या जमिनीचे वर्णन

अ क्र	जमीनीचे मुद्दे	जमीनीबाबतचा तपशिल
१	गावाचे नाव	लोहगांव
२	स. नं.	२८५/३
३	रेखांकन सादर केलेले क्षेत्र (चौ.मी.)	१००००.००
४	रस्ताखालील बाधीत क्षेत्र (चौ मी.)	०.००
५	अकृषिक परवानगीचे क्षेत्र (चौ.मी.)	१००००.००
६	रेखांकनाचे प्रयोजन	निवासी

प्रस्तावातील रेखांकन/बांधकाम नकाशाचा तपशिल

अ. क.	नकाशे	इमारत क/ विंग क	इमारतीचे मजले	सदनिका संख्या	रिफ्युज एरीया	तपशील
१	१/१०	--	---	पार्कींग	-----	रेखांकन नकाशा, स्थळदर्शक नकाशा, क्षेत्रविवरण तक्ता
२	२/१०	विंग ए,	पार्कींग पहिला तिसरा पाचवा सातवा नववा	-- ०८ ०८ ०८ ०८ ०८	--	बांधकाम नकाशा एरीया की प्लॅन, क्षेत्रविवरण तक्ता
३	३/१०	विंग ए	दुसरा चौथा सहावा आठवा	०८ ०८ ०८ ०८	आठव्या मजल्यावर रिफ्युज एरीया दर्शविलेला आहे	बांधकाम नकाशा, क्षेत्रविवरण तक्ता
४	४/१०	विंग ए	--	--	---	सेक्शन, इलिव्हेशन
५	५/१०	विंग बी	पार्कींग पहिला तिसरा पाचवा सातवा नववा	-- ०८ ०८ ०८ ०८ ०८	--	बांधकाम नकाशा, क्षेत्रविवरण तक्ता
६	६/१०	विंग बी	दुसरा चौथा सहावा आठवा	०८ ०८ ०८ ०७	आठव्या मजल्यावर रिफ्युज एरीया दर्शविलेला आहे	बांधकाम नकाशा, क्षेत्रविवरण तक्ता

७	७/१०	विंग बी	--	---	---	सेक्शन, इलिव्हेशन
८	८/१०	विंग सी	पार्किंग पहिला तिसरा पाचवा सातवा नववा	-- ०८ ०८ ०८ ०८ ०८	--	बांधकाम नकाशा, क्षेत्रविवरण तक्ता
९	९/१०	विंग सी	दुसरा चौथा सहावा आठवा	०८ ०८ ०८ ०७	आठव्या मजल्यावर रिफ्युज एरीया दर्शविलेला आहे	बांधकाम नकाशा क्षेत्रविवरण तक्ता
१०	१०/१०	विंग सी	--	---	---	सेक्शन इलिव्हेशन

अटी व शर्ती

१. सदरची परवानगी महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ नुसार व त्याखालील नियमान्वये देणेत येत आहे

२. रेखांकनातील भूखंड/ इमारती हे प्रादेशिक योजना तसेच प्रचलित नियमावलीतील निवासी विभागामध्ये अनुज्ञेय असलेल्या कारणासाठीच वापरणे आवश्यक आहे.

३. येथे कोणतेही विकास कार्य सुरु करण्यापुर्वी हे बांधकामाच्या जागेवर आखुन भूमि अभिलेख खात्याकडुन प्रमाणित करुन घ्यावे लागेल. बांधकामाच्या जागेवर आखलेवर, भुखंडाचे किमान क्षेत्रफळ, नकाशावर दर्शविल्यापेक्षा कमी भरता कामा नये. तसेच रस्त्यांची रुंदी, १५ % सुविधा जागा व १० % खुल्या जागेचे क्षेत्र मंजूर रेखांकनात दर्शविल्यापेक्षा कमी भरता उपयोगी नाही. यामध्ये काही फेरफार झाल्यास अभिन्यास पुन्हा मंजुर करुन घ्यावा लागेल. अशा प्रमाणित रेखाकनांची प्रत या कार्यालयाकडुन अंतिम मंजुरी घेतल्याशिवाय कोणताही विकास करणेत येऊ नये.

४. नियोजीत रेखांकनातील रस्ते, गटारे, खुली जागा इत्यादी अर्जदारांनी सदनिका वितरीत करण्यापुर्वी जागेवर स्वखर्चाने व समाधानकारकरीत्या विकसीत करणे आवश्यक आहे.

५. अभिन्यासातील रस्ते, व खुली जागा यांची देखभाल अर्जदाराने करावयास हवी. अन्यथा ते देखभाल करण्यासाठी सुयोग्य प्राधिकरणाच्या ताब्यात द्यावेत. या जागा व रस्ते सर्व जनतेच्या वापरासाठी खुले असतील. तसेच रस्ते शेजारच्या जमीन मालकास वापरण्यास खुले ठेवले पाहिजेत.

६. वरील जागेचा व नियोजीत इमारतीचा वापर रहिवास वापरासाठी करण्यात यावा व बांधकाम मंजूर नकाशाप्रमाणे असावे.

७. नियोजीत बांधकामातील मजल्यांची संख्या नकाशावर दर्शविल्या पेक्षा जास्त असू नये.

८. स्थलदर्शक नकाशावर दर्शविल्याप्रमाणे नियोजित बांधकामापासून पुढील, मागील बाजुची अंतरे प्रत्यक्षात जागेवर असली पाहिजेत व त्याखालील जागा कायम खुली ठेवावी.

९. नियोजीत बांधकामाचे भुखंडातील अस्तित्वातील अन्य बांधकाम धरुन एकुण क्षेत्र, सुविधा क्षेत्र व प्रादेशिक योजना रस्ते / रस्तारुंदी क्षेत्र वगळता उर्वरीत निव्वळ क्षेत्राच्या नकाशावर दर्शविले

इतके प्रत्यक्ष जागेवर कमाल राहिले पाहिजे.

१०. नियोजीत इमारती मध्ये १/१० रुमच्या क्षेत्रा इतके वायुविजन उपलब्ध होणे आवश्यक राहील.

११. नियोजीत इमारतीसाठी / विकासासाठी आवश्यक असण-या पाण्याची सोय व सांडपाण्याची व मैला निर्मुलनाची व्यवस्था नसल्यास, प्रत्यक्ष वापरापूर्वी अर्जदाराने केली पाहीजे.

१२. नियोजीत बांधकामात मंजूरीपेक्षा वेगळे बदल करावयाचे असल्यास किंवा वापर बदलावयाचा असल्यास पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

१३. प्रस्तावासोबत मो. रं. न. ८७१५/१४ दि. २८/४/२०१४ ने केलेल्या वहीवाटीचे मोजणी नकाशातील हद्दीचे अधिन राहून सदरची शिफारस करणेत येत आहे. विषयाधीन जमिनीचे वहीवाटीचे मोजणी नकाशातील हद्दीचे अधिन राहुन सदरची शिफारस करणेत येत आहे. विषयाधिन जमिनीचे वहीवाटीचे / हद्दीचे अनुषंगाने काही वाद / न्यायालयीन वाद उद्‌भवलेस त्याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदार यांची राहील.

१४. जागेच्या हद्दी, क्षेत्र व मालकी हक्काची छाननी, सहहिस्सेधारकाचे संमतीपत्र याबाबत काही वाद उद्‌भवल्यास त्याची जबाबदारी अर्जदार यांची राहील.

१५. नियोजीत बांधकामामुळे भूखंडावर असलेल्या कोणाच्याही वहीवाटीचे हक्काचा भंग होणार नाही याची जबाबदारी अर्जदार / मालकाची राहील.

१६. प्रस्तुत अकृषिक परवानगी मिळणेकामी अर्जदार यांनी प्रश्नाधीन जमीन नाजकधा कायदयांतर्गत अतिरीक्त घोषीत केलेली नसलेबाबत शपथपत्र बंधपत्र व इतर अर्जासोबत सादर केलेली माहिती चुकीची अथवा दिशाभुल करणारी आढळल्यास प्रस्तुतची परवानगी रद्द समजणेत येईल. तसेच याबाबत अर्जदार यास जबाबदार धरून त्यांचेविरुध्द भा. द. वि. संहितेच्या तरतुदीनुसार फौजदारी कारवाई करणेत येईल.

१७. विषयांकीत रेखांकन / बांधकाम नकाशांची छाननी प्रस्तावासोबत उपलब्ध असणा-या कागदपत्रांच्या आधारे केलेली आहे. (उदा. ७/१२ उतारे, कुलमुखत्यारपत्र, संम्मतीपत्र, मोजणी नकाशा इं.) या कागदपत्राच्या अधिकृततेबाबत व अद्यावत नोंदीबाबत अर्जदार यांची जबाबदारी राहील.

१८. विषयांकीत बांधकाम नकाशाची छाननी, अनुज्ञेय चटई क्षेत्र, भुव्याप्त क्षेत्र याबाबतीत केलेली आहे. बांधकाम नकाशातील गणीतीय चुका वा जागेवर बांधकाम नकाशावर नमुद केल्या व्यतिरीक्त जादा बांधकाम असल्यास त्यास संबंधीत वास्तुशिल्पी व अर्जदार जबाबदार राहतील.

१९. स्टिल्ट भविष्यात बंदीस्त करण्यात येऊ नये. तसेच स्टिल्टचा वापर फक्त पार्किंगसाठीच करण्यात यावा.

२०. रेन वॉटर हार्वेस्टिंग बाबतची यंत्रणा अर्जदार यांनी स्वखर्चाने करावयाची आहे.

२१. सौर उर्जेवर पाणी तापविण्यासाठी यंत्रणा अर्जदार यांनी इमारतीचे वापरापुर्वी स्वखर्चाने करावयाची आहे. तसेच शक्यतर सौर उर्जेवर रस्ताच्या लगतचे पथदिवे बसविण्याचे आहेत

२२. वेस्ट वॉटर ट्रीटमेंट प्लॅन्ट यंत्रणा स्वखर्चाने अर्जदार यांनी करावयाची आहे व पाण्याचा फेर वापर बगीचा,झाडाची जोपासना यासाठी करणे आवश्यक आहे.

२३. विघटन होणा-या ओल्या कच-यासाठी गांडुळखत प्रकल्प अर्जदार यांनी स्वखर्चाने करावयाचा आहे.

२४. शासन नगर विकास विभागाकडील क्र.टिपीव्ही-४३०८/४१०२/ प्र.क्र. ३५९/०८/नवि-११ दि. १९/११/२००८ च्या परिपत्रकाप्रमाणे बांधकाम नकाशामध्ये प्रत्येक सदनिकेचे एकुण चटईक्षेत्र नमुद केलेले आहे. याबाबत गणितिय चुका इ. बाबत वास्तुशिल्पी व अर्जदार जबाबदार राहतील.

२५. सदर भुखंडाचे बांधकाम क्षेत्रफळ ५००.०० चौ. मी. पेक्षा जास्त आहे. त्यामुळे प्रत्येक ८०.० चौ.

पुणे

मी. क्षेत्रासाठी एक झाड या प्रमाणे वृक्षलागवड करणे व जोपासना करणे बंधनकारक राहील.

२६. प्रस्तुत प्रकरणातील जमीनीवर कोणतेही बांधकाम सुरु केले नंतर जोते तपासणी प्रमाणपत्र घेतल्याशिवाय पुढील बांधकाम करता येणार नाही व सदरचे बांधकाम पुर्ण झालेनंतर वापर सुरु करणेपुर्वी वर नमुद सर्व अटीची पूर्तता करुन भोगवटा प्रमाणपत्र घेणे. अर्जदारांवर बंधणकारक राहील अन्यथा नियमानुसार कारवाईस पात्र राहील.

२७. १५ मी. पेक्षा जास्त उंचीच्या इमारतीबाबत -

a. अ वर्ग नगरपरिषदेच्या प्रमाणीत विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र. १३.४ (ii) नुसार प्रस्तावीत इमारतीसभोवताली ६ मी. रुंदीचे पाथवे किमान ४५ टन वजनाचे फायर इंजिनचा भार पेलु शकेल याप्रमाणे डिझाईन करूण विकसीत करणेची जबाबदारी विकासकर्त्याची / अर्जदाराची राहील.

b. अर्जदारांनी प्रस्ताविल्यानुसार सर्व उंच इमारती स्टिल्ट वर असणे आवश्यक राहील त्याच बरोबर वाहनतळ सुविधा शासनाने दि. २८/८/२००९ च्या नोटीशी अन्वये अंतिम केलेल्या नियमानुसार प्रस्तावित करणे आवश्यक राहील.

c. नगर विकास विभागाच्या दिनांक २८/८/२००९ रोजीच्या अधिसुचना प्रमाणे नियम क्र. ४ मधील टीप ii प्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी १५ मी. पेक्षा उंच इमारतीच्या नियोजनातील जिन्याचे व लिफ्टचे स्थान मान्य केलेले आहे. तथापि, या कार्यालयाकडुन मंजूरीसाठी शिफारस केलेल्या याबाबतचे नियोजनानुसार इमारतीचे नियोजनात बदल करणे आवश्यक झाल्यास पुन्हा मुख्य अग्निशमन अधिकारी यांची नव्याने मंजुरी घ्यावी लागेल. तसेच प्रत्येक इमारतीमधील एक स्टेअरकेस व एक लिफ्ट NBC मधील तरतुदीप्रमाणे फायर रेजिस्टन्ट असणे आवश्यक आहे. तसेच उंच इमारतीचे नियोजना अनुषंगाने मुख्य अग्निशमन अधिकारी, पुणे महानगरपालीका यांनी दि. २६/५/२०१४ चे पत्र क्र. FB/७०२ ने दिलेल्या Provisional Fire N.O.C मधील अटी / शर्तीची पूर्तता करणे अर्जदारांवर बंधनकारक राहील.

d. अ वर्ग नगरपरिषदेच्या प्रमाणीत विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र. ६.२, ६.१ नुसार बाबीची पुर्तता तसेच अग्निप्रतिबंधकन उपाययोजनाबाबत पुर्तता करणे अर्जदारांवर बंधनकारक राहील.

e. नेहमीच्या वापराशिवाय अग्निप्रतिबंधक व्यवस्थेकरीता, पाणीपुरवठा, जलनिस्सारण, सांडपाणी, कचरा विल्हेवाट इत्यादी बाबीची पुर्तता अर्जदाराने स्वखर्चाने, स्वजबाबदारीवर करणे आवश्यक राहील.

f. अ वर्ग नियमावलीतील नियम क्र. १८.१ नुसार लिफ्टची सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

g. अशा विकासासाठी इमारतीचे Structural Stability बाबत शासनाच्या नोंदणीकृत Structural Engineer चे प्रमाणपत्र अर्जदाराने जोता तपासणीपुर्वी आपले कार्यालयात व या कार्यालयात दाखल करणे आवश्यक राहील.

h. विकासकाने जोत्यापर्यंतचे बांधकामा केल्यानंतर या कार्यालयास कळविणे आवश्यक आहे. जोत्यापर्यंतच्या बांधकामाना या कार्यालयाने प्रमाणीत केल्यानंतरच पुढील बांधकाम करावे. बांधकाम परवानगीनुसार बांधकामाबाबत संबंधीत विकसक / वास्तुविशारद व संबंधित इंजिनिअर यांनी शहानिशा करणे आवश्यक आहे.जोते तपासणीनंतर बांधकाम / इमारतीची तपासणी ही संबंधित स्ट्रक्चरल इंजिनिअर तसेच संबंधित इंजिनिअर यांनी

करणे आवश्यक राहील. याबाबत भविष्यात कोणतीही हानी अथवा दुर्घटना झाल्यास सर्व संबंधितास जबाबदार धरणेत येईल.

i. अशा इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे व असे भोगवटा प्रमाणपत्र देण्यापुर्वी सर्व अग्निशमन यंत्रणेची पुर्तता व वर नमुद अटीची पुर्तता होणे आवश्यक राहील.

२८. विषयाधीन जागेवर, विषयाधिन जमिनीचा स. नं. निहाय तपशिल, जमिन मालकाचे नाव, विकासकाचे नाव, वास्तुशिल्पीचे नाव, बिनशेती परवाना क्रमांक, इत्यादी आशय दर्शविणारा योग्य आकाराचा फलक लावणे आवश्यक राहील.

२९. उक्त बिनशेतीसाठी प्रस्तावीत जागेचे अथवा गट नंबर मधील उर्वरीत जागेचे तुकडे पाडुन अथवा गुंठेवारी प्रमाणे अनधिकृतरित्या भुखंड पाडता येणार नाहीत. किंवा विकी करता येणार नाही. अशाप्रकारे अनधिकृतरित्या तुकडे पाडल्यास किंवा विकी केल्यास ही परवानगी रद्द समजण्यात येईल.

२९. वायुदलाचे तळापासून भोवतालचे २० कि.मी. हददीचे क्षेत्रात उंच इमारती बांधणेबाबत Air Commanding Officer, Air Force Station लोहगांव यांनी आक्षेप नोंदविलेला आहे. सदर प्रकरणी दि. ३/१२/२०१२ चे वायुदल अधिकारी यांचे मा. जिल्हाधिकारी , पुणे यांचे दालनात झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार वायुदलाचे हद्दी पासुन ० ते १०० मी. अंतरादरम्यान इमारत बांधकाम वापर अनुज्ञेय नाही. १०० मी. ते ४०० मी. अंतरामध्ये पाकीग + ४ बांधकाम मजले वापर अनुज्ञेय आहे. तथापी अर्जदार विकासक यांची जागा ही ६०० मी. अंतरादरम्यान येत असल्याने त्याची पार्कीग +९ मजले दर्शविलेले आहेत. परंतु या प्रस्तावास वायुदलाचे नाहरकत प्रमाणपत्र घेणे अर्जदारावंर बंधणकारक असल्याने. याबाबत अर्जदार यांनी दि.१६/१२/२०१४ रोजी प्रतिज्ञापत्र दाखल करून त्यामध्ये त्यांनी नमुद केले प्रमाणे सदर मिळकतीवर बांधकाम करण्यापुर्वी एअर फोर्स विभागाची नाहरकत प्रमाणपत्र घेणार आहे, असे नमुद केले आहे. त्यास अधिन राहून अकृषिक परवानगी देत आहे.

३०. प्रस्तुत आदेशान्वये केवळ अकृषिक परवानगी दिलेली आहे. वायुदलाचे नाहरकत प्रमाणपत्र मिळाल्यानंतर अर्जदार यांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ मधील कलम १८ अन्वये बांधकाम परवानगी देण्यात येणार आहे.

३१. सदर प्रकल्पातील नियोजीत बांधकाम विकासासाठी स्ट्रक्चरल इंजिनिअर श्री. अकील एम. एच (L. NO. १५५) पुणे यांची नेमणूक करण्यात आली असून त्यांनी सहायक संचालक नगर रचना पुणे यांचेकडे लेटर हेड वर हमीपत्र सादर केले आहे. त्या मध्ये त्यांनी नमूद केल्यानुसार नियोजीत बांधकामाचे स्थिरतेबाबत, बांधकामाबाबतचा दर्जा व गुणवत्ते बाबत संपुर्ण जबाबदारी स्टक्चरल इंजिनिअर यांच्यांवर राहील. सदरचे पत्र अर्जदार यांचे वर बंधणकारक राहील.

३२. अर्जदार यांनी बांधकामाच्या स्थिरतेबाबत २००रु स्टॅम्प पेपरवर दिनांक ५/१२/२०१४ रोजी हमीपत्र सादर केले असुन सदरचे हमीपत्र अर्जदार यांच्यावर बंधनकारक राहील.

३३. अर्जदार यांनी प्रतिवर्षी १००००.०० चौ.मी. या क्षेत्रासाठी निवासी प्रयोजनार्थ ०.१० पै. प्रति चौ.मी. दराने बिनशेती सारा शासनास भरावा. सदर आकारणी तात्पुरत्या स्वरुपाची असून दि.१/८/२००६ पासुन सुधारीत अकृषिक प्रमाणदर अंमलात आल्यानंतर फरकाची रक्कम असलेस ती शासनास जमा करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

३४. प्रस्तुत जमीनीवर शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या अकृषिक दराने प्रतिवर्षी सारा भरणे अर्जदारावर बंधनकारक आहे.

३५. प्रस्तुत जमिनीवर भविष्यात नजराणा रक्कम, अकृषिक सा-यांची फरकाची रक्कम, तडजोड शुल्क

पुणे

अशी काही शासकीय रक्कमेची बाकी उद्‌भवल्यास उपरोक्त रक्कमा भरणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

३६.अर्जदार यांनी सादर केलेली माहिती व कागदपत्रांबाबत व त्यांच्या सत्यतेबाबत संपुर्ण जबाबदारी अर्जदार यांची राहील.

३७. वरील अटी व शर्तीचे पालन करणे याची संपुर्ण जबाबदारी अर्जदार यांची राहील.

जिल्हाधिकारी

पुणे

(सौरभ राव)
जिल्हाधिकारी पुणे

प्रति,
श्री. पंडीत केरु निंबाळकर व इतर
रा. लोहगांव, ता. हवेली, जि. पुणे

वाचले :१) श्री. पंडीत केरु निंबाळकर व इतर रा. लोहगांव, ता. हवेली, जि. पुणे यांचा दि.१६/३/२०१५ रोजीचा अर्ज.

२) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १८

३) या कार्यालयाकडील अकृषिक परवानगी दिलेला आदेश क्र. पमह/ एनए/ एसआर/ ४०१/१४, दि. ११/३/२०१५

४) सहाय्यक संचालक, नगर रचना/ पुणे -३० यांचेकडील पत्र क्र. रेखांकन/ एनएबीपी/ मौ. लोहगांव/ ता. हवेली/ ग. नं. २८५/३ / ससंपु/ ३९१०, दि. २७/६/२०१४

५) एअर फोर्स विभागाकडील नाहरकत प्रमाणपत्र क्र. Air HQ/ s. १७७२६/४/ ATS (PC-MDCCXXXVIII) DY. No. २७७/F/D (Air-II) दि. १२/३/२०१५

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे
महसूलशाखा डिजी / /१४
क्र.पमह/एनए/एसआर/४०१/२०१४
पुणे १ दि.२८/४/२०१५

विषयः- रेखांकन / बांधकाम नकाशांना मंजुरी देणे बाबत.....
मौजे- लोहगांव, ता. हवेली जि. पुणे येथील जमीन स.नं. २८५/३ पै क्षेत्र १००००.०० चौ.मी. क्षेत्रास निवासी प्रयोजनार्थ महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १८ नुसार रेखांकन / बांधकाम नकाशे मंजुर करणेबाबत ...

आदेश

मौजे- लोहगांव, ता. हवेली जि. पुणे येथील जमीन स.नं. २८५/३ पै क्षेत्र १००००.०० चौ.मी. क्षेत्रास निवासी प्रयोजनार्थ महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १८ नुसार रेखांकन बांधकाम नकाशास मंजुरी मिळणेबाबत श्री. पंडीत केरु निंबाळकर व इतर रा. लोहगांव, ता. हवेली, जि. पुणे यांनी दि. १५/५/२०१४ रोजी या कार्यालयाकडे विनंती अर्ज केलेला आहे.

त्यानुसार प्रकरणांची छाननी करुन व तांत्रिक शिफारस विचारात घेवून अर्जदार यांना या कार्यालयाकडील आदेश क्र. पमह /एनए/ एसआर/ ४०१/१४, दि. ११/२०१५ अन्वये वायुदल विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीवर महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये अकृषिक परवानगी देण्यात आलेली होती. सदर आदेशान्वये बांधकाम आराखडे मंजूर केलेले नव्हते.

परंतु अर्जदार यांनी या दिनांक १२/३/२०१५ अन्वये अर्ज करुन सोबत एअर फोर्स विभागाचे नाहरकत पत्र क्र. Air HQ/ s. १७७२६/४/ ATS (PC- MDCCXXXVIII) DY. No. २७७/F/D (Air-II) दि. १२/३/२०१५ सादर केले आहे. त्यानुसार सदर प्रकरणी सहायक संचालक नगर रचना पुणे यांनी त्यांचे कडील पत्र क्र. रेखांकन/ एनएबीपी/ मौ. लोहगांव/ ता. हवेली/ ग. नं. २८५/३ / ससंपु/ ३९१०, दि. २७/६/२०१४ अन्वये बांधकाम नकाशांना मंजुरीची शिफारस केलेली होती. त्यानुसार अर्जदार यांनी बांधकाम नकाशांना मंजुरी मिळावी म्हणुन विनंती केलेली आहे.

प्रादेशिक योजना प्रस्ताव व अनुज्ञेयता -

विषयांकीत प्रकरणी मुळ मालकाचे क्षेत्र २७१००.०० चौ.मी. असून त्यापैकी अर्जदार यांच्या मालकीचे क्षेत्र १००००.०० चौ.मी. असल्यामुळे तेवढयाच क्षेत्रावर नियोजीत बिनशेती समुह गृहबांधणी

योजनेकरीता रेखांकन / बांधकाम प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यानुसार सदर प्रस्तावाखालील जागा ही मंजूर पुणे प्रादेशीक योजनेतील सेक्टर एच मध्ये अंतर्भुत असून त्यातील तरतुदीनुसार रहिवास विभागात समाविष्ट होत आहे. तसेच सदर जागेस दक्षीण बाजुस अस्तित्वातील २४.०० मी. रुंद पोहोच रस्ता उपलब्ध आहे. सदर रस्त्याची आखणी रेखांकन / बांधकाम नकाशावर योग्य पणे दर्शविलेली आहे. त्यामुळे प्रस्तुत जागेच्या १००००.०० चौ.मी. अबाधीत क्षेत्रावर नियोजीत रहिवास / वाणिज्य वापर अनुज्ञेय होत आहे. नियोजीत रेखांकन / बांधकाम नकाशाच्या हद्दी प्रकरणा सोबतच्या मुळ वहिवाटीनुसारचे मोजणी नकाशानुसार सर्वसाधारणपणे जुळतात. अशी शिफारस सहायक संचालक नगर रचना पुणे यांनी केलेली आहे.

जागा पहाणीचा तपशिलः- जागा पाहणी केली असता जागा खुली व समपातळीत असून जागेस पुर्व बाजुस १२ मी. रुंद पोहोच रस्ता उपलब्ध आहे.

वरील परिस्थिती विचारात घेता आणी अर्जदार यांनी सादर केलेली वायुदलाचे नाहरकत प्रमाणपत्र विचारात घेता पुर्व परवानगी सोबत बांधकाम / रेखांकन मंजूरीची परवानगी दिलेली नसल्याची बाब विचारात घेता अर्जदार यांना महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम १८ अन्वये जिल्हाधिकारी, पुणे यांना प्रदान करणेत आलेल्या शक्तीनुसार मी, सौरभ राव, जिल्हाधिकारी पुणे, अर्जदार श्री. पंडीत केरु निंबाळकर रा. लोहगांव, ता. हवेली, जि. पुणे यांनी मौजे- लोहगांव, ता.हवेली,जि. पुणे येथील जमीन स..नं. २८५/३ पै. क्षेत्र १००००.०० चौ.मी. क्षेत्रास निवासी प्रयोजनार्थ, सहा. संचालक नगररचना, पुणे यांच्याकडील पत्र क्र. रेखांकन/ एनएबीपी/मौ. लोहगांव/ ता.हवेली/ ग.नं.२८५/३ /संसपु/३९१०, दिनांक २७/६/२०१४ च्या शिफारसीस अधिन राहुन घेवुन खालील अटी व शर्तीवर रेखांकन/ बांधकाम आराखडयास परवानगी देण्यात येत आहे.

रेखांकन / बांधकाम नकाशे मंजुर करावयाच्या जमिनीचे वर्णन

अ क्र	जमीनीचे मुद्दे	जमीनीबाबतचा तपशिल
१	**गावाचे नाव**	**लोहगांव**
२	स. नं.	२८५/३
३	रेखांकन सादर केलेले क्षेत्र (चौ.मी.)	१००००.००
४	रस्ताखालील बाधीत क्षेत्र (चौ मी.)	०.००
५	अकृषिक परवानगीचे क्षेत्र (चौ.मी.)	१००००.००
६	रेखांकनाचे प्रयोजन	निवासी

प्रस्तावातील रेखांकन/बांधकाम नकाशाचा तपशिल

अ. क.	नकाशे	इमारत क/ विंग क	इमारतीचे मजले	सदनिका संख्या	रिफ्युज एरीया	तपशील
१	१/१०	--	---	पार्कीग	-----	रेखांकन नकाशा, स्थळदर्शक नकाशा, क्षेत्रविवरण तक्ता
२	२/१०	विंग ए,	पार्कीग पहिला तिसरा पाचवा सातवा नववा	-- ०८ ०८ ०८ ०८ ०८	--	बांधकाम नकाशा एरीया की प्लॅन, क्षेत्रविवरण तक्ता

३	३/१०	विंग ए	दुसरा चौथा सहावा आठवा	०८ ०८ ०८ ०८	आठव्या मजल्यावर रिफ्युज एरीया दर्शविलेला आहे	बांधकाम नकाशा, क्षेत्रविवरण तक्ता
४	४/१०	विंग ए	--	--	---	सेक्शन, इलिव्हेशन
५	५/१०	विंग बी	पार्कींग पहिला तिसरा पाचवा सातवा नववा	-- ०८ ०८ ०८ ०८ ०८	--	बांधकाम नकाशा, क्षेत्रविवरण तक्ता
६	६/१०	विंग बी	दुसरा चौथा सहावा आठवा	०८ ०८ ०८ ०७	आठव्या मजल्यावर रिफ्युज एरीया दर्शविलेला आहे	बांधकाम नकाशा, क्षेत्रविवरण तक्ता
७	७/१०	विंग बी	--	---	---	सेक्शन, इलिव्हेशन
८	८/१०	विंग सी	पार्किंग पहिला तिसरा पाचवा सातवा नववा	-- ०८ ०८ ०८ ०८ ०८	--	बांधकाम नकाशा, क्षेत्रविवरण तक्ता
९	९/१०	विंग सी	दुसरा चौथा सहावा आठवा	०८ ०८ ०८ ०७	आठव्या मजल्यावर रिफ्युज एरीया दर्शविलेला आहे	बांधकाम नकाशा क्षेत्रविवरण तक्ता
१०	१०/१०	विंग सी	--	---	---	सेक्शन इलिव्हेशन

अटी व शर्ती

१. सदरच्या रेखांकन/ बांधकाम नकाशांना परवानगी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १८ व त्याखालील नियमान्वये देणेत येत आहे.

२. **या कार्यालयाकडील आदेश क्र. पमह / एनए /एसआर/ ४०१/ १४, दि. ११/३/२०१५ रोजीच्या आदेशातील अट क्र. २९ व ३० रद्द करणेत येत आहेत व इतर सर्व अटी व शर्ती कायम ठेवण्यात येत आहेत.**

३. अर्जदार यांनी प्रतिवर्षी १००००.०० चौ.मी. या क्षेत्रासाठी निवासी प्रयोजनार्थ ०.१० पै. प्रति चौ.मी. दराने बिनशेती सारा शासनास भरावा. सदर आकारणी तात्पुरत्या स्वरुपाची असून दि.१/८/२००६ पासुन सुधारीत अकृषिक प्रमाणदर अंमलात आल्यानंतर फरकाची रक्कम असलेस ती शासनास जमा करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

४. प्रस्तुत जमीनीवर शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या अकृषिक दराने प्रतिवर्षी सारा भरणे

अर्जदारावर बंधनकारक आहे.

५. प्रस्तुत जमिनीवर भविष्यात नजराणा रक्कम, अकृषिक सा-यांची फरकाची रक्कम, तडजोड शुल्क अशी काही शासकीय रक्कमेची बाकी उद्‌भवल्यास उपरोक्त रक्कमा भरणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

६. पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण यांचे कडे सुधारीत् परवानगीच्या वेळेस काही शासकीय रक्कमेची बाकी उद्‌भवल्यास उपरोक्त रक्कम भरणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

७. अर्जदार यांनी सादर केलेली माहिती व कागदपत्रांबाबत व त्यांच्या सत्यतेबाबत संपुर्ण जबाबदारी अर्जदार यांची राहील.

८.वरील अटी व शर्तीचे पालन करणे याची संपुर्ण जबाबदारी अर्जदार यांची राहील.

जिल्हाधिकारी पुणे

(सौरभ राव)
जिल्हाधिकारी पुणे

प्रति,
श्री. पंडीत केरु निंबाळकर व इतर
रा. लोहगांव, ता. हवेली, जि. पुणे